शपथेवर पुढील सरतपास श्री देवाळकर विधीज्ञ मार्फत अर्जदारातर्फे :–

०५. शपथपत्र नि.क्र.यु–२३ मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझया सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. आता मला प्रकरणामध्ये दाखल नि.क्र.यु–२४ वरील एकात्मीक बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना वैशाली अशोक ठवरे यांना कामावर रूजु करून घेण्याबाबत मी व गावकरी यांनी दिलेला अर्ज दाखविला. त्यावर माझी पा.क्र.२ वर अ.क्र.५१ वर नाव व सही आहे.

उलट–तपास श्री गिरडकर विधीज्ञ मार्फत गैरअर्जदारातर्फे :–

०६. हे म्हणणे खरे आहे की मी अर्जदार हीला ओळखतो. आम्ही अर्जदार व मी एकाच गावाचे रहिवाशी आहोत. हे म्हणणे खरे आहे की आज मी व अर्जदार न्यायालयात सोबत आलो आहोत. माझे मुलं सध्या अंगणवाडी मध्ये शिकत नाही. माझे मुले ७ वर्षा आधी अंगणवाडीमध्ये शिकत होते. अर्जदारा बाबत गावातील काही लोकांनी तक्रार केली होती. सध्या अंगणवाडी बंद आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केले असुन खोटी साक्ष देत आहे.

माझे समक्ष

(श्रीमती रू.वि. मेटे)

चंद्रपुर. न्यायाधीश

दि.१७.०२.२०२२. कामगार न्यायालय, चंद्रपुर